# जिल्हा व सत्र न्यायालय, लातूर

## शिपाई पदाच्या मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना महत्वाच्या सूचना

1) **उमेदवाराने मुलाखतीसाठी येते वेळेस खालील कागदपत्रे व त्याच्या साक्षांकित प्रती प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, लातूर यांचेकडे सादर करणे अनिवार्य आहे.**
   - i) जन्मतारखेचा दाखला किंवा पुरावा (शाळा सोडल्याचा/जन्माचा/एस.एस.सी. दाखला)
   - ii) अर्हता परिक्षा/पदवी परिक्षा उत्तीर्ण झाल्याबाबतचा दाखला
   - iii) अर्हता परिक्षेत/पदवी परिक्षेत मिळालेल्या गुणांचे विवरणपत्र
   - iv) दोन सन्माननीय व्यक्ती ज्यांची नावे मुळ अर्जात नमूद केलेली आहेत, त्यांनी दिलेला, त्यांचे/तिचे चारित्र्य चांगले असल्याबद्दलचा चारित्र्याचा दाखला.
   - v) संबंधीत जिल्हा सरकारी रुग्णालयातील जिल्हा शल्य चिकीत्सक/वैद्यकीय अधिक्षक यांनी दिलेला अपंगत्वाचा दाखला, लागू असल्यास.
   - vi) शासन विहित करेल त्या प्राधिका–याने दिलेला जातीचा दाखला, जेथे लागू असेल तेथे.
   - vii) छोटया लहान कुटुंबाबाबतचे प्रतिज्ञापत्र {नमूना 'अ' (मुळ)}, जे जाहिरातीचे शेवटी उपलब्ध आहेत.
   - viii) विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र, जर उमेदवार यापुर्वीच शासकीय सेवेत कार्यरत असेल तर

2) **शिपाई पदाच्या उमेदवारांचे मुलाखतीचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.**

| दिनांक | वेळ | | मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या यादीवरील अणुक्रमांक | उमेदवारांची एकूण संख्या |
|---|---|---|---|---|
| | कागदपत्रे तपासणी | प्रत्यक्ष मुलाखत | | |
| 24/8/2018 | सकाळी 10.30 वाजता | — | 1 ते 82 | — |
| 26/8/2018 | — | सकाळी 10.00 वाजता | 1 ते 82 | 82 |
| 27/8/2018 | सकाळी 10.30 वाजता | दुपारी 2.30 वाजता | 83 ते 127 | 45 |
| 28/8/2018 | सकाळी 10.30 वाजता | दुपारी 2.30 वाजता | 128 ते 172 | 45 |
| 29/8/2018 | सकाळी 10.30 वाजता | दुपारी 2.30 वाजता | 173 ते 217 | 45 |
| 30/8/2018 | सकाळी 10.30 वाजता | दुपारी 2.30 वाजता | 218 ते 262 | 45 |
| 31/8/2018 | सकाळी 10.30 वाजता | दुपारी 2.30 वाजता | 263 ते 307 | 45 |

3) उमेदवाराने मुलाखतीच्या विहित वेळेपेक्षा अर्धा तास अगोदर जिल्हा न्यायालयात उपस्थित राहावे.

4) मुलाखतीसाठी प्रवेश मिळविण्यासाठी उमेदवाराने त्यांना देण्यांत आलेले प्रवेश प्रमाणपत्र परीक्षेच्यावेळी सोबत आणणे आवश्यक आहे.

5) मुलाखतीस येतेवेळी स्वतःच्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वतःचे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी किमान एक ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

6) जर एखाद्या उमेदवाराने निवड प्रकियेसंदर्भात स्वतः अथवा इतर कोणाही मार्फत निवड समितीचे सदस्य, जिल्हा न्यायालयातील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना भेटण्याचा किंवा त्यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास सदर उमेदवारास अनर्ह ठरविण्यात येईल. याबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

7) परिक्षेच्या वेळापत्रकामध्ये बदल करण्याचे अधिकार निवड समितीकडे राखीव राहतील.

आदेशावरुन